# बृहन्मुंबई महानगरपालिका
## मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष

**परिपत्रक**

**क्र.प्रअभिअ/०३ दि.१४.८.२००८**

विषयः महत्त्वाच्या पुराभिलेखाचे Digitalisation पध्दतीने जतन करण्याबाबत

संदर्भः १. परिपत्रक क्र.प्रअभिअ/०१ दिनांक १७.६.२००८
२.परिपत्रक क्र.प्रअभिअ/०२ दिनांक २३.७.२००८

उद्देश - माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४ अंतर्गत जनतेस माहिती पुरविणे महापालिकेस बंधनकारक असल्यामुळे web-enabled डिजीटलाईजड अभिलेख कक्ष मधून नागरिकांना आवश्यक अभिलेख कमी दरात उपलब्ध होऊ शकेल.

मध्यवर्ती पुराभिलेख कक्षातर्फे उपरोक्त संदर्भान्वये प्रसारित केलेल्या परिपत्रकानुसार मनपाच्या प्रत्येक खाते / विभागातील महत्त्वाच्या पुराभिलेखाचे (Digitised) पध्दतीने जतन करण्यासाठी आपल्या खाते / विभागातील पुराभिलेखास कांदिवली (पूर्व) म.न.पा.गाळे (Ware House) मध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

कार्यालयीन व ऐतिहासिक महत्व असणाऱ्या पुराभिलेखाचे व दस्ताऐवजाचे निर्जंतुकीकरण करुन ते प्रत्येक खात्यास दिलेल्या जागेत सुव्यवस्थित रचणे ही जबाबदारी त्या खाते / विभागातील अभिलेख अधिकारी म्हणून नेमणूक केलेल्या एका अधिकाऱ्याची व त्याच्या सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांची असेल. त्या समन्वयक अधिकारी (Nodal Officer) यांचे नाव ३० ऑगस्ट २००८ पर्यंत सह आयुक्त (सुधार) कार्यालयात पाठविण्यात यावे. दस्तऐवज पाठविताना प्रशासकीय विभागवार व वर्षवार वर्गीकरण व नोंदणी करुन पाठविणे अपेक्षित आहे.

उपरोक्त सूचनांची सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी. आपल्याला आवश्यक असलेल्या जागेची निश्चिती करण्याकरीता सोबत जोडलेल्या तक्त्यात माहिती भरुन ३० सप्टेंबर २००८ पर्यंत पाठवावी.

जर काही खातेप्रमुख यांना आपल्या कार्यालयातील लोखंड / लाकडी रॅक्स उपरोक्त कक्षाकरीता द्यावयाचे असल्यास त्याची माहिती स्वतंत्रपणे जोडावी.

उपरोक्त सूचनांची सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| **सही/- दि. १४.०८.२००८** | **सही/- दि. १४.०८.२००८** | **सही/- दि. १४.०८.२००८** |
| **(व्ही. राधा)** | **(अनिल डिग्गीकर)** | **डॉ. जयराज फाटक** |
| **सह आयुक्त (सुधार)** | **अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)** | **महापालिका आयुक्त** |

---

प्रत ..........................................................................................................
(------------ जादा प्रतींसह) यांना माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित.

**सही/-**
**प्रमुख अभिलेख अधिकारी**

# अभिजतन माहिती तक्ता

**समन्वय अधिका-याचे नाव -**
**खाते -**

| | वर्ग | अ | ब | क-२ | क-१ | क | ड | लांबी /रुंदी अभिलेख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रजिस्टर संख्या | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| नोंदवही (संख्या ) | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| धारिणी (संख्या) | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| नकाशा (संख्या) | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| ट्रेसिंग व छायांकित नकाशे (संख्या) | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| जमीन दस्ताएवज (संख्या) | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| ऐतिहासिक महत्त्वाचे अभिलेख | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |
| इतर काही गट असल्यास | एकूण कपाटे (संख्या) | | | | | | | |

नोंद - वेगवेगळया अभिलेखांचे नमुने मध्यवर्ती पुराभिलेख कक्षात पाठविण्याची व्यवस्था करावी.

अधिक तपशीलाकरिता संपर्क **e-mail-jtmcsplcoord@yahoo.in**

**श्री.ज्योतिषा यो. देसाई प्रमुख अभिलेख अधिकारी**
**दूरध्वनी ९८६९९०६६४६**
**२२६२०२५१ विस्तार ३२३५**

**समन्वय अधिकारी (Nodal Officer)**
**नांव -**
**खाते -**

| दूरध्वनी क्रमांक | कार्यालय | विस्तार | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|
| | | | |